**<u>ठळक बातम्या</u>**

- गावखेड्यांचं रूपांतर समृद्धी आणि संधींचं प्रकाशमान केंद्र म्हणून करायला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणातील तीन आरोपींना अटक
- शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची तरतूद नव्या कायद्यात करणार असल्याची कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची ग्वाही
- भाभा अणु संशोधन केंद्राचे माजी संचालक विख्यात भौतिक शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं निधन

**आणि**

- बॉर्डर गावस्कर चषकाच्या शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताला पहिल्या डावात ४ धावांची माफक आघाडी, मात्र दुसऱ्या डावात भारताची फलंदाजी पुन्हा गडगडली.

**<><><><><>**

गावखेड्यांचं रूपांतर समृद्धी आणि संधींचं प्रकाशमान केंद्र म्हणून करायला तसंच ग्रामीण भारताला सक्षम करायला केंद्र सरकारचं प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत ग्रामीण भारत महोत्सवाचं उदघाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. वर्ष २०१४ पासून केंद्र सरकार सातत्यानं ग्रामीण भारताच्या विकासासाठी

कार्यरत असून ग्रामीण जनतेला प्रतिष्ठेचं जीवन प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. देशातल्या प्रत्येक गावात सर्व आवश्यक सोईसुविधा असाव्यात यासाठी केंद्र सरकारने अनेक योजना कार्यान्वित केल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. ग्रामीण समाजाला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना तीन लाख कोटी रुपयांची मदत करण्यात आल्याचं ते म्हणाले. याशिवाय स्वच्छ भारत अभियान, पीएम आवास, जल जीवन मिशन, शुद्ध पेय जल व्यवस्था, निरामय आयुष्यासाठी आरोग्यसेवा यांसारख्या योजना सुरु असून केंद्रीय मंत्रिमंडळानं नुकतीच पीएम पीक विमा योजनेला आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे, गेल्या १० वर्षात कृषी कर्जाच्या रकमेत साडे तीन पट वाढ झाली. आता पशुपालक आणि मत्स्यपालकांनाही किसान क्रेडिट कार्ड दिले जात आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी या महोत्सवात सहभागी झालेल्या कारागिरांशी संवाद साधला. या महोत्सवाला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी उपस्थित होते.

**<><><><><>**

सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणी आज तीन आरोपींना अटक करण्यात आली. सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या दोन फरार आरोपींना बीड पोलीस दलाच्या विशेष पथकानं आज सकाळी पुण्यात अटक केली. या दोघांना पुढील तपासासाठी सी आय डी च्या ताब्यात देण्यात येणार आहे,

असं पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी सांगितलं . या दोन आरोपींना आज केज इथल्या न्यायालयात हजर करण्यात आलं.

या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना फरार घोषित केलं होतं. कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे.

हत्या प्रकरणात सहभाग असल्याच्या आरोपावरून सिद्धार्थ सोनावणे या आणखी एका संशयिताला विशेष शोध पथकानं मुंबईत अटक केली.

**<><><><><>**

शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिक इथं बातमीदारांशी बोलत होते. नव्या कायद्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी पोलिसांनी करायच्या कारवाईबाबत पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावा, असं कोकाटे यांनी म्हटलं आहे. पोलिस अधिकारी जाणीवपूर्वक व्यापाऱ्यांना वेगळी वागणूक देत असून याबाबतचं प्रकरण समोर आल्यास कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा कोकाटे यांनी दिला आहे.

**<><><><><>**

भारतीय सेनादल हे जगातल्या सर्वोत्तम सेनादलांपैकी एक असून भूदल, नौदल आणि वायुदल अशा कोणत्याही मार्गाने होणाऱ्या हल्ल्याला तोंड द्यायला सक्षम आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

समर्थ भारत, सक्षम सेना या संकल्पनेअंतर्गत लष्कराच्या दक्षिण कमांडने पुण्यात आयोजित केलेल्या नो युवर आर्मी मेळाव्याच्या उद्घाटनाच्या वेळी ते काल बोलत होते. या मेळाव्यात भारतीय सैन्यदलाच्या क्षमता आणि संरक्षणक्षेत्रातले स्टार्टअप यासह नवोन्मेष क्षेत्रात सुरू असलेलं प्रचंड काम बघायला मिळत आहे, असं फडणवीस यांनी नमूद केलं. या उपक्रमाद्वारे नागरिकांना जवानांशी संवाद साधता येईल, युवकांना सैन्यदलात भरती होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

भारताच्या विज्ञान क्षेत्रात मत्त्वपूर्ण योगदान देणारे विख्यात भौतिक शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं आज पहाटे मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार, भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणु ऊर्जा विभागाचे केंद्रीय सचिव अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी आपल्या कारकीर्दीत सांभाळल्या.

चिदंबरम यांना 1975 मध्ये पद्मश्री आणि आणि 1999 मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं .

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर चिदंबरम यांच्या निधनाबद्दल शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

<><><><><>

पंजाब मध्ये बर्नाला इथं आज झालेल्या एका रस्ते अपघातात ३ जण ठार आणि ३० जण जखमी झाले. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्यानं हा अपघात झाल्याचं  पोलिसांनी सांगितलं. जखमींना भटिंडा आणि फरीदकोट इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

<><><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या, सिडनी इथं सुरू असलेल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात, भारतानं दुसऱ्या दिवसअखेर आपल्या दुसऱ्या डावात ६ बाद १४१ धावा केल्या आहेत.

आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव१८१ धावांत गुंडाळला आणि पहिल्या डावात ४ धावांची माफक आघाडी मिळवली. भारताच्या वतीनं मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ३ तर जसप्रीत बुमराह आणि नितेश रेड्डी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाच्या वतीनं पदार्पणवीर वेबस्टर यानं सर्वाधिक ५७ धावा केल्या.

त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताचा डाव पुन्हा एकदा गडगडला. मात्र ऋषभ पंत यानं ३३ चेंडूत ६६ धावा करत भारताच्या धावसंख्येत मोठी भर घातली. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा रविंद्र जडेजा ८ धावांवर तर वॉशिंग्टन सुंदर ६ धावा करून खेळपट्टीवर टिकून होते.

दरम्यान या सामन्यासाठी कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत असलेला जसप्रित बुमराह याला सामना सोडून वैद्यकीय तपासणीसाठी जावं लागल्यानं, त्याच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

**<><><><>**

न्यूझीलंडच्या ऑकलंडमध्ये सुरु असलेल्या ए एस बी क्लासिक टेनिस स्पर्धेत पुरुष एकल प्रकारात भारताच्या सुमित नागलनं न्यूझीलंडच्या अलेक्झांडर क्लीचारोवचा १-६, ६-३, ६-१ असा पराभव केला. उद्या होणाऱ्या अंतिम पात्रता फेरीत त्याची गाठ फ्रान्सच्या एड्रियन मॅनेरिनो याच्याशी पडणार आहे.

**<><><><>**

खराब हवामानामुळे द्राक्षाची बाजारपेठेतील आवक लांबल्यानंतर, आता सांगलीच्या बाजारपेठेत द्राक्षाची आवक सुरू झाली आहे.

स्थानिक विक्री बरोबरच द्राक्ष निर्यातीलाही सुरुवात झाली आहे. दुबई आणि सौदी अरेबियात नऊ कंटेनर्स मधून १७२ मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.

सांगली जिल्ह्यात यंदा ८ हजार ४४० शेतकऱ्यांनी ४ हजार २२० एकर क्षेत्रावर निर्यातक्षम द्राक्षाचे उत्पादन घेतल्याची नोंद कृषी विभागाकडे झाली आहे.

**<><><><>**

**<><><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरच्या ड्युटी फ्री दुकानांमध्ये काम करणाऱ्या चार कर्मचाऱ्यांना महसूल गुप्तचर संचालनालयानं अटक केली आहे. तस्करीचं सोनं विमानतळाबाहेर पोहोचवण्याचं काम ते करत असत. त्यांच्याकडून सुमारे ४ कोटी ८४ लाख रुपये किमतीची  ६ किलो सोन्याची भुकटीही जप्त करण्यात आली.

**<><><><><>**

मुंबईत थंडावलेली प्रतिबंधित प्लास्टिक कारवाई मोहिम आजपासून पुन्हा कडक केली जाणार आहे. २०१८ मधलं प्लास्टिक बंदीचं धोरण आताही लागू असेल, असं मुंबई महापालिकेनं  स्पष्ट केलं आहे. प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या वापरल्यास, बाजारपेठा, हॉटेल, मॉलसह सामान्य नागरिकांवरही आता नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. मुंबई महापालिका, पोलिस प्रशासन आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ संयुक्तपणे ही कारवाई करणार आहे.

**//<><><><><>//**